Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १८९ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.११ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# नाना पटोले हे शरद पवार,उद्धव ठाकरे समोर बोलू शकत नाही–अशोक चव्हाण

**नागपूर (वृत्तसंस्था)–महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी काँग्रेसचे नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या स्वप्नांवर पाणी टाकले आहे. उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यासमोर एक शब्दही नाना बोलू शकत नाही. त्यांच्यामुळे काँग्रेसच्या अनेक जागा शिवसेनेला गेल्या. यामुळे अनेकांमध्ये नाराजी आहे. ज्या नेत्याने कधीही नेतृत्व केले नाही, जो कधी लोकांमध्ये गेला नाही अशा लोकांना मोठी पदे दिली तर अशीच अवस्था होणार, अशी खरमरीत टीका अलीकडेच भाजपवासी झालेले खासदार अशोक चव्हाण यांनी केली.**



महाराष्ट्रामध्ये गेल्या काही दिवसांपासून सांगलीचा तिढा कायम होता. महाविकास आघाडीमध्ये शिवसेना ठाकरे गटाकडून डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. मात्र सांगलीची जागा आजवर काँग्रेसची राहिली आहे. त्यामुळं काँग्रेसला मिळावी, यासाठी काँग्रेसकडून अथक प्रयत्न करण्यात आले होते. विश्वजीत कदम यांनी याबाबत पुढाकार घेत विशाल पाटील यांनाच उमेदवारी मिळेल, असा विश्वास व्यक्त करत दिल्लीपर्यंत धडक दिली होती. महाराष्ट्रातल्या काँग्रेसच्या नेत्यांनीदेखील सांगलीची जागा काँग्रेसलाच मिळेल, असा दावा केला होता. त्यामुळे महाविकास आघाडीतही शिवसेना आणि काँग्रेस यांच्यात तणाव निर्माण झाला होता. मात्र अखेर सांगलीची जागा महाविकास आघाडीमध्ये शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) वाट्याला गेलीय. काँग्रेसने अनेक जागा शिवसेनेला दिल्याने नाना पटोले यांच्या नेतृत्वावर अशोक चव्हाण यांनी टीका केली. नाना पटोले यांनी काँग्रेसचे नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या स्वप्नांवर पाणी टाकले आहे. उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यासमोर एक शब्दही नाना बोलू शकत नाही. त्यांच्यामुळे काँग्रेसच्या अनेक जागा शिवसेनेला गेल्या. यामुळे अनेकांमध्ये नाराजी आहे अशी टीका चव्हाण यांनी केली.

मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गुजरातचे मुख्यमंत्री होते. त्यावेळीही मी त्यांचा चाहता होतो. आज मोदींची दूरदृष्टी आणि त्यांचे काम पाहून मी भाजपात आलो आहे. त्याला मोदींविषयी आस्था आणि प्रेम आहे. मी विरोधाला केवळ विरोध करणारा नेता नाही. आणि भाजपमध्ये का गेलो हे सांगायला मला कमीपणाही वाटत नाही, असेही अशोक चव्हाण म्हणाले.

## वढोलीत युवा शेतकऱ्याचा शेतात काम करताना आकस्मिक मृत्यू

**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**



गोंडपिपरी तालुक्यातील वढोली येथील युवा शेतकऱ्याचा शेतात काम करताना आकस्मिक मृत्यू झाल्याची घटना दि (९ ) मंगळवारी सायंकाळी ६ वाजता दरम्यान उघडकीस आली.

वढोली येथील शेतकरी शांताराम जानकिराम चुदरी वय( ४५) शेतात कचरा पेटवण्यासाठी सकाळी ११ वाजता गेले सायंकाळ झाली तरी ते घरी न परतल्याने कुटुंबीयांनी गावात शोध घेतला नंतर शेताकडे जाऊन बघितल्या नंतर शेतात मृतावस्थेत आढळले.त्यांच्यावर कर्जाचे डोंगर होते कुटुंबातील ते एकटे कमावते कर्ते होते.कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला कुटुंबियांना सानुग्रह निधी तुन मदत शाशनाने करावी अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.मृतदेह शेतात असल्याची माहिती पोलिसांना देण्यात आली ठाणेदार रमेश हत्तिगोटे घटनास्थळी दाखल होऊन मृतदेह उत्तरीय तपासणी साठी पाठीवले.बुधवारी मृतकाचे अंतिम संस्कार पार पडले.त्यांच्या पच्यात आई,पत्नी,मुलगा,मुलगी असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

## ‘दिल्ली’च्या लढतीत व्यस्त नेत्यांचे ‘गल्ली’कडे दुर्लक्ष

## दोन लाख मतदारांची पाण्यासाठी ससेहोलपट

**बुलढाणा**–लोकसभा निवडणुकीच्या राजकारणात व्यस्त नेत्यांचे सर्वसामान्यांच्या समस्या, अडचणीकडे साफ दुर्लक्ष होत आहे. बुलढाणा मतदारसंघातील कमीअधिक दोन लाख मतदारांचे घडाभर पाण्यासाठी बेहाल होत असताना नेते मात्र प्रचार, राजकारणात व्यस्त आहे. यावर कळस म्हणजे टंचाईच्या भीषण झळा सत्ताधाऱ्यांच्या मतदारसंघानाच पोहोचत आहे.

बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील मेहकर तालुका खासदार प्रतापराव जाधव यांच्या गृहक्षेत्रात आहे. तीन वेळा जाधवांना आमदार व राज्यमंत्री बनविणाऱ्या मेहकर विधानसभा मतदारसंघाचा मेहकर तालुका केंद्रबिंदू आहे. या तालुक्यातील वरवंड, जवळा, बोथा, वडाळी या गावांतील हजारो ग्रामस्थांना रहिवाशांना पिण्याच्या पाण्यासाठी केवळ टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर अवलंबून राहण्याची पाळी आली आहे. याशिवाय तीस गावांना अधिग्रहित खासगी विहिरींवरून होणाऱ्या पुरवठ्यावर तहान भागविण्याची दुर्दैवी वेळ आली आहे. वडाळी, रत्नापूर, उकळी, खंडाळा, निंबा, बारडा, लोणी काळे, हिवरा साबळे, शेंदला, लवणा, सुकळी, मेळ जानोरी, गणपूर, जयताळा, मोळा, पारडी, मारोती पेठ, वरवंड, वरमला पारधी वस्ती, सुळा, पारखेड, पांगरखेड, उटी, विश्वि, खामखेड, पाचला, खुदनापूर, जावळा, बोथा, शहापूर, मोहना खुर्द या टंचाईग्रस्त गावांचा समावेश आहे. लोणार तालुक्यातील ४ गावांना अधिग्रहित विहिरावर अवलंबून राहावे लागत आहे.



## महायुतीला राज ठाकरेंच्या पाठिंब्याची गरज नव्हती–रामदास आठवले

**नागपूर**–राज्यात महायुती सक्षम असल्यामुळे राज ठाकरे यांच्या पाठिंब्याची गरज नव्हती आणि महायुतीला त्यांची आवश्यकता नव्हती. मात्र त्यांनी पाठिंबा दिला आहे तर लोकसभा निवडणुकीत त्यांचा किती फायदा होईल, हे दिसेलच, अशी प्रतिक्रिया रिपब्लिकन पक्षाचे नेते आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिली.

रामदास आठवले नागपुरात पत्रकारांशी बोलत होते. राज ठाकरे यांनी कुठलीही अपेक्षा न ठेवता पंतप्रधान नरेंद्र मोदींना बिनशर्त पाठिंबा दिला, त्यामुळे त्यांचे स्वागत करतो. मात्र त्याचा किती फायदा होईल हे आताच सांगता येणार नाही. विधानसभा निवडणुकीत त्यांना महायुतीमध्ये जागा देण्याचे आश्वासन देण्यात आले असेल त्यामुळे त्यांनी पाठिंबा दिला असावा, असेही आठवले म्हणाले.



लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाने दोन जागांची मागणी केली होती. त्यात शिर्डी मतदारसंघाचा समावेश होता. त्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी प्रयत्न केले, मात्र आम्हाला संधी मिळाली नसली तरी केंद्रामध्ये कॅबिनेट मंत्रिपद मिळावे, अशी मागणी आम्ही केली आहे. महायुतीमध्ये असल्यामुळे निवडणुकीच्या काळात भूमिका बदलविणे अतिशय अयोग्य आहे. आम्ही राज्यात महायुती आणि केंद्रात एनडीएसोबत राहणार असल्याचे आठवले म्हणाले.इंडिया आघाडी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बदनाम करण्याचे काम करत आहे. मात्र जनता मोदींच्या सोबत आहे. त्यांना परिवार नसला तरी देशातील १४० कोटी जनता हाच त्यांचा परिवार आहे. संविधान बदलविण्याचा कोणालाही अधिकारी नाही. विरोधकांकडून संविधान बदलविणार अशी अफवा पसरविली जात आहे. काँग्रेस आणि राहुल गांधींच्या भुलथापाना बळी पडू नका. संविधान बदलवण्याची जी वक्तव्ये विरोधकांकडून केली जात आहे, अशांकडून संविधानाला जास्त धोका असल्याचे आठवले म्हणाले.विधानसभेत आम्हाला ९ ते १० जागा मिळेल. याबाबत चर्चा केली जाईल. बाळासाहेब आंबेडकर यांनी मल्लिकार्जुन खर्गे, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांची भेट घेतली मात्र त्यांना त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यांचा अपमान करण्यात आला त्यामुळे त्यांनी स्वबळावर निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आणि तो योग्य असला तरी यावेळी वंचितला फारसा प्रतिसाद मिळणार नाही असेही आठवले म्हणाले.

## भाजपला मनसेच्या पाठिंब्यामुळे उत्तर भारतीयांमध्ये असुरक्षिततेची भावना–आंबेडकर

**अकोला :** लोकसभेच्या रिंगणात भाजपने ‘सेल्फ’ गोल केला. भाजपला मनसेने दिलेल्या पाठिंब्यामुळे उत्तर भारतीयांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज येथे केली. सांगलीचे विशाल पाटील वंचितच्या संपर्कात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अकोल्यात बुधवारी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मुंबईसारख्या शहरात मनसे किंवा शिवसेना यांनी अगोदर आंदोलन उभे केले होते. ‘लुंगी हटाव, पुंगी बजाव’, त्यानंतर उत्तर भारतीयांच्या विरोधातले आंदोलन उभे केले. मनसेने धारावी या ठिकाणी छट पूजेला विरोध केला आणि बिहारमधील लोकांना मारले. मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी भाजप आणि मोदींना पाठिंबा दिल्यामुळे मुंबईत राहणारे बिहार, उत्तर व दक्षिणेतील ज्यांना भाजप जवळची वाटत होती, त्यांना असुरक्षित वाटू लागले आहे, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.मुंबईचे उमेदवार आम्ही जाणीवपूर्वक जाहीर केले नाहीत. निवडणूक सुरू झाल्यानंतर मनसेचा पाठिंबा भाजपवाले घेतील आणि ते झाले की, मुंबईमधील पूर्ण गणित बदलते. त्यासाठी आम्ही थांबलो होतो. उद्या संध्याकाळपर्यंत आम्ही मुंबईमधील उमेदवार जाहीर करु, असे त्यांनी सांगितले.



सांगलीमध्ये शिवसेनेचे काहीच नव्हते. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी मिळून ती जागा घेतली. आज सकाळीच विशाल पाटील यांचे बंधू प्रतीक पाटील यांनी भेट घेतली आणि चर्चाही केली. लवकरच ते निर्णय घेतील, अशी अपेक्षा असल्याचे ड. आंबेडकर यांनी नमूद केले.

## अपघाताच्या घटनेवरून राजकारण करणे चुकीचे–चंद्रशेखर बावनकुळे



**नागपूर :** काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अपघाताबाबत काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केलेले आरोप चुकीचे आहे. महाराष्ट्र संस्कारमय आहे. असे घातपात महाराष्ट्रात कोणी करत नाही आणि त्यांना महाराष्ट्राचे संस्कार कळले नाही. अशा घटनेमध्ये जे राजकारण करतात ते चुकीचे आहे, अशी टीका भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

एकीकडे उद्धव ठाकरे हिंदुत्ववादी विचार सोडून काँग्रेसच्या दावणीला बांधले गेले आहेत. हिंदू विरोधी असलेल्या स्टॅलिनला साथ देत आहे. त्यात राज ठाकरे हिंदुत्वाचा विचार पुढे घेऊन जात असताना त्यांनी महायुतीला पाठिंबा दिला आहे त्यामुळे आता महायुती अजून मजबूत होईल, असे मत चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. उद्धव ठाकरे यांनी स्वतःच्या कुटुंबाचा विचार करून काँग्रेसला साथ दिली आणि शिवसेनेच्या विचाराला मूठमाती दिली. स्वतःच्या कार्यकर्त्यांशी त्यांनी बेईमानी केली आहे. ते हिंदुत्व विरोधी आहे. केवळ सत्तेसाठी त्यांना सोनिया गांधी, शरद पवारांकडे जावे लागत आहे, हेच दुर्देव असल्याचे बावनकुळे म्हणाले.

राज ठाकरे यांना आम्ही कधीही कमळावर लढा असा आग्रह धरला नाही. त्यांना कमळावर लढा असे आम्ही कधीच म्हणणार नाही आणि म्हटले नाही. राज ठाकरे यांच्या पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व असून त्यांनी महायुतीला पाठिंबा देण्याचा घेतलेला निर्णय योग्य आहे. यामुळे राज्यात आता महायुती अधिक मजबूत होईल असेही बावनकुळे म्हणाले. देशाचे पंतप्रधान मोदी व्हावे म्हणून त्यांनी पाठिंबा दिला आहे. आता विधानसभा निवडणुकीत पुढे काय होईल याबाबतचा निर्णय ते घेतील असेही बावनकुळे म्हणाले.

## रश्मी बर्वे यांना दिलासा नाहीच,सर्वोच्च न्यायालयानेही फेटाळली याचिका

नागपूर : जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष आणि काँग्रेस नेत्या रश्मी बर्वे यांचे जातवैधता प्रमाणपत्र जिल्हा जातप्रमाणपत्र पडताळणी समितीने रद्द ठरविले होते. यामुळे त्यांचा रामटेक लोकसभा निवडणुकीतील अर्ज रद्द करण्यात आला होता. या विरोधात त्यानी न्यायालयात दाद मागितली होती. यावर उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने जातवैधता प्रमाणपत्र समितीच्या निर्णयाला स्थगिती दिली होती, मात्र निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास नकार दिला. यानंतर बर्वे यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. मात्र सर्वोच्च न्यायालयातून बर्वे यांना दिलासा मिळाला नाही. बुधवारी न्या. भूषण गवई, न्या. संदीप मेहता आणि न्या. सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने बर्वे यांची याचिका फेटाळली.मागील आठवड्यात गुरुवारी उच्च न्यायालयाने रश्मी बर्वे यांना दिलासा देत जातवैधता समितीच्या निर्णयाला अंतरिम स्थगिती दिली होती. मात्र निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असल्याने त्यात हस्तक्षेप करण्यास न्यायालयाने नकार दिला होता. न्या. अविनाश घरोटे आणि न्या. मुकुलिका जवळकर यांच्या खंडपीठाने हा अंतरिम आदेश दिला होता. न्यायालयाने सर्व प्रतिवादी यांना नोटीस बजावून २४ एप्रिलपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेशही दिले आहेत.



## प्रकाश आंबेडकर यांनी माझ्या चेहऱ्याकडे पाहून नाही तर कामाकडे पाहून तिकीट दिले–वसंत मोरे

**पुणे**–राज्यात सध्या विविध पक्ष आणि नेत्यांची खिचडी झाली आहे. जनता यामुळे वैतागलेली आहे. वंचित बहुजन पक्षात मी चांगला मराठा उमेदवार असून, प्रकाश आंबेडकर यांनी माझ्या चेहऱ्याकडे पाहून नाही तर कामाकडे पाहून तिकीट दिले आहे, असा दावा पुण्यातील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार वसंत मोरे यांनी बुधवारी पत्रकारांशी बोलताना केला. माझे सोशल मीडियावर ८.५ लाख फॉलोअर्स असून, यापैकी दीड लाख पुण्यातील रहिवासी आहेत. निवडणुकीत या सर्वांची मते मला मिळतील, असेही ते यावेळी म्हणाले.

वसंत मोरे म्हणाले, यंदा तिरंगी लढत पुण्यात असून विजयी होण्यासाठी ४ लाख मतदान लागणार आहे. भाजपची मोदी लाट असताना ६ लाख ३२ हजार मते होती, शिवसेना सोबत होती. सेनेला बाजूला केल्यास ५ लाख मते त्यांच्या हातात आहेत. मात्र, आता ४५ हजार मतदान कमी झालेले आहे. त्यामुळे आता केवळ ५० हजार मतदान वळवण्याचे काम आहे.भाजपला माजी खासदार गिरीश बापट यांची उणीव भासेल. त्याचा त्यांना फटका बसेल. सकल मराठा समाजाला मी वेळोवेळी अडचणीच्या काळात पाठिंबा दिला आहे. त्यांची मते यंदा मला अधिक प्रमाणात मिळू शकतात. सकल मराठा समाजाने मनोज जरांगे यांचे सांगण्यानुसार काम केले पाहिजे. अडचणीच्या काळात भाजप आणि काँग्रेस उमेदवाराने समाजासाठी काही केले नाही. मुस्लिम समाजात भोंग्याबाबत मी जो निर्णय घेतला त्यामुळे मला त्यांचेही समर्थन आहे, असे वसंत मोरे म्हणाले.

## रेल्वेच्या धडकेत गुराखी व गाय ठार

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील बोन्ड (राजूली ) येथील रेल्वे फाटके जवळ म्हशी व गायला वाचवन्याच्या नादात गुराखीने स्वतःचा जीव गमावल्याची घटना १० एप्रिल बुधवारी सकाळी १०:५० वाजताचे दरम्यान घडली. दौलत हनाजी कुत्तरमारे (वय ७०वर्ष )असे मृतकाचे नाव असुन सदर इसम बोन्ड येथील रहिवाशी आहे.सध्या उन्हाळा चालू असल्यामुळे दोन पाळीत जनावरे चरायला नेतात.रोजच्या प्रमाणे आजही सकाळी म्हशी आणि गायी चरायला नेण्यासाठी रेल्वे रस्ता ओलांडून जंगलात गेला.१०:५० वाजता दरम्यान घरी जनावरे परत आणत असताना गोंदिया –चांदाफोर्ट ही गोंदियावरून चंद्रपूरकडे जाणारी प्यासेंजर रेल्वे जात होती. नेमक्या त्यांचवेळेस म्हशी आणि गायी रेल्वे रस्ता फाटक ओलांडून गावाच्या दिशेने येत होती. गायी व म्हशी यांना वाचवण्यासाठी सदर गुराखी गेला. रेल्वेचा धक्का लागल्यामुळे दौलत हना कुत्तरमारे व एक गाय जागीच ठार तर एक म्हस जखमी झाली .मृतकाच्या डोक्याला व पायाला मार लागला आहे.गावात लागलीच ही वार्ता पसरताच शोककळा पसरली.मृतक दौलत कुत्तरमारे यांचे मागे पत्नी, दोन मुले, दोन मुली व नातवंड असा आप्त परिवार आहे.


# क्रांतिसूर्याचा उदयः स्त्रीमुक्ती व स्त्रीशिक्षण!

**क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांची इतर नावे महात्मा फुले, ज्योतिबा फुले, आबा, राष्ट्रपितामह, तात्यासाहेब, शिक्षणसम्राट आदी आहेत. ते मराठी लेखक, कवी, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली; शेतकरी, कामगार, अस्पृश्य व बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची पेरणी केली. तसेच त्यांनी महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या जयंतीच्या पावन पर्वावर त्यांचे ऋणनिर्देश करणारा श्री कृष्णकुमार लक्ष्मी–गोविंदा निकोडे यांचा हा लेख अभ्यासा... संपादक.**

स्त्री अथवा पुरुष जे शेतकरी अथवा कलाकौशल्य करून पोटे भरण्यात जन्म सार्थक मानतात, परंतु शेतकरी वगैरेंना मदत करणाऱ्यांचा आदरसत्कार करतात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे, असा महात्मा फुले यांनी मानवास सत्यधर्माचा बोध केला. त्यातील काही वचने आपण वाचली की लक्षात येते, की त्यांचा आवाका किती मोठ्ठा होता? त्यांना अखिल विश्वाला कवेत घेणाऱ्या माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणारा धर्म साकार करायचा होता. आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला. सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजाचा आवाज ही भारतात अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ समाजाची किंकाळी होय. वेद हे ईश्वरनिर्मित नसून ते मानवनिर्मित आहेत, असे जोतीरावांचे ठाम मत होते. वेदाने समाजात भेद पडले. म्हणून वेद म्हणजे भेद असे त्यांना वाटे. पोथीतील जातींच्या उत्पत्तीविषयीची कल्पना त्यांना मुळीच मान्य नव्हती. ब्रह्मदेवाच्या मुखातून ब्राह्मण जन्मले, क्षत्रिय बाहुतून जन्मले, शूद्र त्याच्या पायातून निघाले हे विधान त्यांना भयंकर आणि धादांत असत्य वाटे. मनुस्मृती ही शूद्रांच्या बोकांडी गुलामगिरी बसविते म्हणून ती अपवित्र आहे, असे म्हणून त्यांनी मनुस्मृतीचा धिक्कार केला. भ.बुद्धाविषयी जोतिरावांना नितांत आदर वाटे.


शेतकऱ्यांचे आसूड हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. तत्कालीन समाजातील जातिभेद अनिष्ट प्रथा, तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरुद्धची प्रतिक्रिया त्यांच्या साहित्यातून उमटलेली होती. त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी असल्याचे सर्वमान्य आहे. त्यांनी दिलेल्या शिक्षणाच्या बीजमंत्राने बहुजन समाज खडबडून जागा झाला. त्यांचे ते शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे मंत्र– ओळी सर्वांना तोंडपाठ झाल्या आहेत–

विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली।
नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले।
वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।।



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

जोतिबा फुलेजींचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. त्याच गावी त्यांचा जन्म दि. ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुलेजींचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते. त्यामुळे गोरे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले. तेच नाव पुढे रूढ झाले. जोतीरावजी केवळ नऊ महिन्यांचे होते, तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. जोतीबांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी सावित्रीमाईंशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स.१८४२मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लख, त्यामुळे पाच–सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. ग्रामची या प्रसिद्ध तत्ववेत्त्याने महात्मा फुले यांना 'सेंद्रिय बुद्धिवंत' असे संबोधले आहे. जोतीराव करारी वृत्तीचे होते. त्यांस गुरुजनांविषयी व वडीलधाऱ्या माणसांविषयी फार आदर वाटत असे. ते आपला अभ्यास मन लावून करत असत. परीक्षेत त्यांना पहिल्या श्रेणीचे



गुण मिळत असत. शाळेतील शिस्तप्रिय व हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा नावलौकिक होता. पुढे महात्मा फुलेजींनी मुलींच्या शिक्षणासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यांनी मुलींसाठी तद्वतच अस्पृश्य मुलांसाठी देखील शाळा सुरू केली. त्यांना स्त्री शिक्षणाची प्रेरणा मावस बहीण– सगुणाबाई क्षिरसागर यांच्याकडून मिळाली. बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून त्यांनी ही सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी इ.स.१८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे वाड्यात महाराष्ट्रातील मुलींची पहिली मराठी शाळा काढली. तेथील शिक्षिकेची जबाबदारी पत्नी– क्रांतिज्योती सावित्रीमाईंवर सोपविली. त्यांच्या सोबतीला ज्ञानज्योती फातिमाबी शेख सावलीसारख्या होत्या. यानंतर जोतिबांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या. त्यावेळी पुण्यात बरेच कबीरपंथी फकीर येत असत. चांगले लिहायला व वाचायला येणाऱ्या जोतिबांकडून रोज संतश्रेष्ठ कबीरांचा 'बीजमती' हा ग्रंथ वाचून घेत असत. त्यामुळे त्यांच्या मनावर संत विचारांची शिकवण चांगलीच बिंबली अनेक दोहे त्यांना पाठ झाले. त्यातील एक–

नाना वर्ण एक गाय, एक रंग है दूध।
तुम कैसे बम्मन हम कैसे क्षूद।।

कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे, असे रोखठोकपणे बोलत. मात्र या विश्वाची निर्मिती करणारी कोणती तरी गुप्तशक्ती आहे, अशी त्यांची विचारसरणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने रहावे, असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्याचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतिकारक म्हणूनही जोतीरावांचे दर्शन होते. नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे, हा विचार मांडणारे जोतीराव एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व होते. महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधन करण्यासाठी शेतकऱ्यांचा आसूड, गुलामगिरी आदी ग्रंथ लिहून सामाजिक प्रबोधन केले. मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावरून विश्वकुटुंब कसे निर्माण होईल? त्याकरिता कशा प्रकारचा वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे? हे जोतीराव फुलेंनी आपल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' संहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडले आहे–

धर्म राज्य भेद मानवा नसावे।
सत्यानें वर्तावें। ईशासाठीं।।
सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागतों।
मनुजा सांगतो। जोती म्हणें।।

(महात्मा फुले समग्र वाङ्मय: सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक: अखंड– पृ.क्र.५५९.)

बहुजन समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील मुलांपर्यंत शिक्षण पोहचवणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. वेदांना झुगारून जोतिबांनी हे कार्य करण्यास सुरवात केली. त्यांनी जातीय भेद आणि चातुर्वर्णीय भेदभावास विरोध करण्यास सुरूवात केली. तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीमाई फुले यांनी केले. त्यांच्याबरोबर १९ स्त्रिया सत्यशोधक समाजाचे कार्य करीत होत्या. त्याचवेळी त्या एका कन्याशाळेच्या शिक्षिकाही होत्या. त्यानंतर मुख्याध्यापिकाही झाल्या. छ.शाहू महाराजांनी या सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला होता. न्याय, अत्याचार व गुलामगिरी यांपासून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता व त्यांना हक्काची जाणीव करून देणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. या समाजाने पुरोहितांशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. तेही स्वरचित मंगळाष्टके उच्चारून–

देवाचे नियमां प्रमाण धरुनी, चालें तुझें कूळ गे।।
सत्यानें अवघ्यांत श्रेष्ठ असशी, तैसेच हे त्वत्सगे।।
अज्ञान्या समदृष्टिनें शिकविशी, तूं ज्ञान त्या दाविशी।।
प्रीतीनें वरितों तुला अजि तुझी, ऐकून कीर्ति अशी।।
.... शुभमंगल सावधान।।१।।

(महात्मा फुले समग्र वाङ्मय: सत्यशोधक समाजोक्त पूजा–विधी: मंगळाष्टक– वर: पृ.क्र.४३४.)

जोतिबा फुलेजींना मुंबईच्या जनतेनेच महात्मा ही पदवी बहाल केली होती. ही पदवी त्यांना इ.स.१८८८ साली मिळाली. महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास फुले–शाहू–आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतात. दि.२४ सप्टेंबर १८७३ रोजी त्यांनी आपल्या अनुयायांसह सर्व जातीतील लोकांना समान हक्क मिळवण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. यात सर्व जाती धर्मातील लोकांनीं एकत्रित येऊन उत्पीडित वर्गाच्या उन्नतीसाठी काम केले. तर–

सर्वसाक्षी जगत्पती।
त्याला नकोच मध्यस्ती।।

हे या समाजाचे घोषवाक्य होते.

सर्वसामान्यांचे कैवारी शिक्षणसम्राट महात्मा जोतीरावजी फुले हे दि.२८ नोव्हेंबर १८९० रोजी पुणे येथे निर्मिकांकी कायमचे विसावले. आज सर्वत्र त्यांचा पावन स्मृतिदिन खरा शिक्षकदिन मानून बहुजन समाजातर्फे गावोगावी आठवडाभर विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. तो आता शासन दरबारीही लागू होण्याची प्रतिक्षा आहे, हे येथे उल्लेखनीयच!

!! पावन जयंतीनिमित्त त्यांच्या चरणकमली या लेकरांचे कोटी कोटी विनम्र अभिवादन !!


# महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार

**सामाजिक, मानसिक, धार्मिक व आर्थिक गुलामगिरीतून मुक्तता करावयाची असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही, असे सांगणारे शिक्षणक्रांतीचे जनक, स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते, भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी आपले सबंध आयुष्य वेचणारे महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म ११ एप्रिल, १८२७ रोजी पुणे येथे झाला. त्याकाळात सर्व समाज घटकातील स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र यांना कोणतेही अधिकार नव्हते, अज्ञानाच्या अंधकारात खितपत ठेवणारी समाजव्यवस्था अस्तित्वात होती. हे समाज घटक ज्ञानबंदी, बेटीबंदी, रोटीबंदी, भेटीबंदी आणि समुद्र पर्यटनबंदी या पंचबंदीवासात अनेक पिढ्यांपासून बंदीस्त होते, हा काळ स्त्री शूद्रतिशूद्रांसाठी 'तमोयुग' बनला होता. या बंदीवासातून मुक्त करत, तमोयुगातून 'तेजोयुगात' म्हणजेच 'ज्ञानयुगात' रुपांतरीत करण्याचे क्रांतिकारी कार्य क्रांतीबा ज्योतिबा फुले यांनी केले. १ जानेवारी, १८४८ रोजी पुणे येथील तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात हिंदुस्थानातील पहिली मुलींची शाळा सुरू केली, हे काम म्हणजे भारतीय संस्कृतीच्या इतिहासातील एका नव्या युगाचा आरंभ होय, म्हणून स्त्री शूद्रतिशूद्रांसाठी हा क्रांतीदिवस होता. कारण सावित्री– जोतिबांनी ज्ञानज्योत लावली आणि पिढ्यान– पिढ्यांच्या अज्ञानाचा अंधकार नष्ट झाला. येथूनच जोतिबांच्या शैक्षणिक विचार, कार्य आणि कर्तुत्वाला म्हणजेच 'ज्योतीयुगाला' सुरुवात झाली.**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आणि गुलामगिरी नष्ट करण्याचे माध्यम आहे. अविद्यामुळे मती, निती, गती, वित्त व प्रगती खुंटते, स्त्री – शूद्रातिशूद्रांच्या अनार्थाचे, दुःखाचे आणि अधोगतीचे मूळ हे अज्ञानात आहे. शिक्षण हे सर्व दुःखांवर एकमेव औषध आहे, शूद्रातिशूद्र आणि बहुजनाच्या उद्धाराचा तो पाया आहे. एखाद्या पुरुषाला शिक्षण दिले तर ते एका व्यक्तीला दिल्यासारखे आहे परंतु एखाद्या स्त्रीला शिक्षण दिले तर ते संपूर्ण कुटुंबाला दिल्यासारखे आहे. पुरुषांच्या शिक्षणापेक्षा स्त्रीयांचे शिक्षण महत्त्वाचे आहे, कारण स्त्री मुलांचे बालपणापासून संगोपन करते, वळण लावते. मुलांच्या सर्वांगीण विकासाची मूळ बालपणात असतात, बालपणात बालकाचे डोळस संगोपन झाले तर मुलांचा विकास, कुटुंबाचा विकास आणि पर्यायाने राष्ट्राचा विकास होऊ शकतो आणि हे स्त्री शिक्षणातूनच शक्य आहे. तेव्हा समाजात बदल वा परिवर्तन घडवायचे असेल तर स्त्रियांसह सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे, हे महात्मा फुले ओळखले होते. परंतु तेव्हा शिक्षण तळागाळातील सामान्य माणसांना देण्यापेक्षा ते समाजातील उच्च वर्गाला दिले, तर झिरपत झिरपत ते सामान्य वर्गापर्यंत पोहोचेल असा युक्तिवाद लॉर्ड मेकॉले यांनी मांडला. या सिद्धांताला झिरपता सिद्धांत म्हणतात. २४ नोव्हेंबर, १८३९ रोजी लॉर्ड फॉर प्लांट यांनी हा सिद्धांत सरकारचे शिक्षणविषयक धोरण म्हणून स्वीकारला. हा सिद्धांत महात्मा फुलेंना अजिबात मान्य नव्हता. या धोरणाला त्यांनी कडाडून विरोध केला. 'गुलामगिरी' या ग्रंथात ते लिहितात, सरकार असे सुखस्वप्न बाळगत आहे की, उच्च वर्गातील लोक हे कनिष्ठ वर्गातील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करतील. हे सुखास्य उराशी बाळगून गरीब शेतकऱ्यांकडून सरकार जो सारा गोळा करते, ते सर्व वसुल उत्पन्न सरकार वरिष्ठ लोकांच्या शिक्षणावर उधळते. विद्यापीठे श्रीमंतांच्या मुलांना शिक्षण देतात, ऐहिक उन्नती साधण्यासाठी साहाय्य करतात. परंतु त्या विद्यापीठात आलेल्या सुशिक्षितांनी आपल्या देशबांधवांच्या उन्नतीच्या कार्यात काहीही भर घातली नाही हे वास्तव ज्योतीबांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. सरकारने कनिष्ठ जातीतील लोकांच्या शिक्षणाची आबाळ केली, असे त्यांनी सरकारला स्पष्ट सांगितले. ते म्हणतात 'आजपावेतो लक्षावधी रुपये विद्या खात्याकडून खर्ची पडले तरी त्यापासून शूद्रांच्या संख्येच्या मानाने त्यांच्यात विद्वान लोकांचा भरणा वाढला नाही, इतकेच नव्हे तर महार, मांग, चांभार या शूद्र जातींत एकही शिकलेला कामगार आढळत नाही. हे वास्तव निदर्शनास आणून दिले. शिक्षण वरिष्ठ वर्गीयांकडून कनिष्ठ वर्गीयांकडे झिरपणार नाही, तेव्हा सरकारने स्वतःच शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे, प्रथम खालच्या वर्गाला शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण द्यावे. 'आधि पाया व मंग कळस' म्हणजे शिक्षण खालून वर गेले पाहिजे, बहुसंख्य लोकांना प्रथम शिक्षण प्राप्त झाले नाही तर त्या शिक्षणाला काहीही अर्थ उरणार नाही, तेव्हा शिक्षण सर्वांनाच मिळाले पाहिजे, हा विचार ज्योतीबांनी आग्रहाने मांडला. इंग्रज सरकारचे शिक्षणविषयक धोरण हे अन्यायकारक व अदूरदर्शीपणाचे आहे, उच्चवर्णियांसाठी पुष्कळ खर्च होतो पण खेड्यांतील शेतकरी, कष्टकरी जनतेच्या शिक्षणावर मात्र पुरेशा खर्च केला जात नाही, असा ज्योतीबांचा मुख्य आक्षेप होता. तेव्हा हे ब्रिटिशांचे शैक्षणिक धोरण त्यांना मान्य नव्हते. लॉर्ड रिपन यांच्या कारकीर्दीत सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली १८८२ साली एक शिक्षण आयोग नियुक्त केला होता, ज्योतीबांनी १९ ऑक्टोबर, १८८२ रोजी पुणे येथे हंटर शिक्षण आयोगाला शिक्षणाच्या बाबतीत सविस्तर निवेदन दिले, या निवेदनात पुढील प्रमाणे सूचना केल्या. खेड्यापाड्यात प्राथमिक शिक्षणाची सोय करावी, १२ वर्षापर्यंत असलेल्या सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे, स्थानिक सरकारने निम्मा ५०% निधी प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा, आदिवासी जाती–जमातींना शिक्षणात प्राधान्य देण्यात यावे, प्राथमिक शाळांना प्रांतिक सरकारने भरपूर अनुदान द्यावे, प्राथमिक शाळांवर होणाऱ्या खर्चाची जबाबदारी नगरपालिकांनी घ्यावी, सरकारने कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणावर लक्ष द्यावे, शिक्षक शेतकरी समाजातून आलेला असला तर अधिक उत्तम, शिक्षकांची नेमणूक करताना



डॉ.प्रकाश खेत्री,
छ.संभाजीनगर,
७८४३०९२२४४



अध्यापनशास्त्राची परीक्षा दिलेले म्हणजेच प्रशिक्षित शिक्षक शाळेवर नेमावेत, शिक्षकांचा पगार उत्तम असावा, त्यामुळे बुद्धिमान तरुण उत्तम शिक्षण घेत, शिक्षकी पेशात येतील, आदी मागण्या केल्या. महात्मा फुलेंनी मांडलेले हे शैक्षणिक विचार दीडशे वर्षांनंतरही पूर्ण होत नाहीत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ६५ वर्षांनी, ज्योतिबांनी मांडलेल्या विचाराच्या १२६ वर्षानंतर केवळ एक विचार कायद्यात परावर्तित झाला, तो म्हणजे २००९ चा ०६ ते १४ वर्षापर्यंत शिक्षण सक्तीचे व मोफत हा कायदा. महात्मा फुले यांचे सर्व शैक्षणिक विचार जर कायद्यात परावर्तित झाले. तर आज भारत सशक्त, समृद्ध आणि महासत्ता झाल्याशिवाय राहणार नाही परंतु स्वतंत्र भारतातही हे होतांना दिसून येत नाही किंवा त्याचा कोणी आग्रह धरत नाही, हे खेदजनक आहे. उलट शिक्षणाचे होत असणारे खाजगीकरण चिंताजनक आहे.

अभ्यासक्रमाविषयीही महात्मा फुले यांनी अत्यंत मूलभूत विचार मांडलेले आहेत. प्राथमिक शिक्षणातून पोपटपंची व पुस्तकी ज्ञान देण्यापेक्षा या शिक्षणातून व्यावहारिक ज्ञान मिळाले पाहिजे. विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभा करेल आणि भावी आयुष्याला दिशा मिळेल, यासाठी ब्रिटिश सरकारने अभ्यासक्रम व शिक्षण यंत्रणेत अमुलाग्र बदल करायला हवेत. शिक्षणात मोडी, बालबोध, लेखन, वाचन, हिशोबाची माहिती, इतिहास, भूगोल, व्याकरण, शेतकीचे प्राथमिक ज्ञान, नीती व आरोग्य यांचा अभ्यासक्रमात समावेश असावा. तसेच ग्रामीण व शहरी भागातील जनतेच्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रमाचे स्वरूप ठरवावे, त्यात वेगळेपणा असावा. शहरी विद्यार्थ्यांच्या तुलनेने ग्रामीण अभ्यासक्रम साधा, सोपा, जीवन आणि दैनंदिन व्यवहाराला पूरक असावा, अभ्यासक्रमात आधुनिक शेती विषयीचे ज्ञान द्यावे, ग्रामीण शाळांना आदर्श शेतीची प्रात्यक्षिके जोडली पाहिजेत म्हणजेच कृतीतून शिक्षण दिले पाहिजे. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडेल, देशाची प्रगती होईल. कालानुरूप अभ्यासक्रमात पुनर्रचना करावी, अभ्यासक्रम तांत्रिक व नैतिक असावा, कलागुणांना वाव द्यावा, शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षण अधिकाऱ्यांनी ग्रामीण भागातील शाळांची वर्षातून तीन–चार वेळा तपासणी करावी, पूर्वसूचना न देता शाळेला भेटी द्याव्यात, शाळा तपासून सुधारण्यासंदर्भात सूचना कराव्यात. शाळांना सरकारने अनुदान द्यावे, अनुदानाचा संबंध निकालाशी जोडण्यात येऊ नये, शाळांवर सरकारचेच नियंत्रण असावे, ज्ञानप्रसाराच्या दृष्टीने शासनाने अधिक प्रयत्न करायला हवेत, विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी यासाठी त्यांना बक्षिसे देऊन प्रोत्साहित करावे. अस्पृश्य वर्गासाठी विशेष शाळा उघडाव्यात, शूद्रातिशूद्रांच्या शाळेत ज्या त्या समाजाचे शिक्षक नेमावेत, खेडयापाडयातील लोक परिस्थितीने गांजलेले असल्याने त्यांच्या मुलांना खास शैक्षणिक सवलती द्याव्यात. सरकारने शैक्षणिक धोरण ठरवताना स्त्री – शुद्रतिशूद्र, शेतकरी लोकांची परिस्थिती आणि मते विचारात घ्यावेत, तेव्हाच त्या शैक्षणिक धोरणाला पूर्णत्व प्राप्त होईल. असे महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार व मत होते. पुणे नगरपालिकेच्या समिती पुढे ३० ऑक्टोबर, १८८२ रोजी पशुवैद्यकीय महाविद्यालय काढण्याचा एक ठराव आला. ज्योतीबांनी तो संमत केला, तसेच दुसरा ठराव नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीची संख्या वाढवावी हा होता, हा ठराव पास करण्यासाठी नगरपालिकेने सरकारी शाळा इतर खाजगी संस्थांना देऊ नयेत, या अटीवर हा ठराव मंजूर केला. म्हणजेच त्या काळात महात्मा फुले यांनी नवीन ज्ञानशाखांचे स्वागत आणि पुरस्कार केला व शिक्षणाच्या खाजगीकरणाला विरोध केला.

नवीन शैक्षणिक धोरण, २०२० च्या अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार महत्वपूर्ण आणि दिशादर्शक वाटतात, शिक्षण हे समग्रक्रांतीचे साधन आहे, अन्नाप्रमाणे ते प्रत्येकाचे पोषण करते, शोषणाविरुद्ध लढण्याची शक्ती देते. तेव्हा समाजातील सर्व घटकांला शिक्षण सर्व समावेशक, समान, सक्तीचे आणि मोफत मिळाले पाहिजे, सरकारचे ते उत्तरदायित्व आहे. असे महात्मा फुले ब्रिटीश सरकारला वारंवार सांगत. तेव्हा हीच आठवण आपणही आपल्या सरकारला करून द्यायला हवी. महात्मा फुले जयंती दिनी आज हेच खऱ्या अर्थाने त्यांच्या पावन स्मृतींना अभिवादन ठरेल.... !

# जय किसान फार्मर्स फोरमच्या कृषी गौरव पुरस्कारांचे नाशिकमध्ये वितरण

## नागपूर येथील सेंद्रीय शेती तज्ज्ञ राजेंद्र गावंडे यांच्या उपस्थितीत ३० शेतकरी सपत्निक सन्मानित

**नाशिक । प्रतिनिधी**

भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतीदिनानिमित्त काल १० एप्रिलला प. सा. नाट्यगृह, सार्वजनिक वाचनालय, नाशिक येथे आंतरराष्ट्रीय कृषी शास्त्रज्ञ डॉ. रमेश ठाकरे व एम एस स्वामीनाथन फौंडेशनचे संचालक डॉ. एन. परशुरामन यांच्या हस्ते नागपूर येथील सेंद्रीय शेती तज्ज्ञ राजेंद्र गावंडे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ३० शेतकऱ्यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. यावेळी मंचावर ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. जयराम पूरकर, इफकोच्या संचालिका साधनाताई जाधव, लोकविद्यापिठाचे महासंचालक डॉ. मंगेश देशमुख, नागपूर येथील सेंद्रीय शेती तज्ज्ञ राजेंद्र गावंडे,नगरसेवक रुची कुंभारकर, जि.प. सदस्य गोरक बोडके, सिध्देश्वर (बापू) शिंदे, डॉ. सुभाषराव शिंदे, पांडुरंग चव्हाण आदी प्रमुख मान्यवरांची उपस्थिती होती.

पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांमध्ये राधाकिसन सावळीराम काकड, विरेंद्र आबाजी जाधव, विलास मोतीराम भालेराव, बाळासाहेब दशरथ चव्हाण, सिताराम दशरथ चव्हाण, विजय त्र्यंबक खैरे, योगेश शंकरराव माळोदे, राजाराम एकनाथ पिंपळे, गणेश बाबुराव थोरात, दिपक सुकदेव पवार, सतिष पांडुरंग उबाळे, मनोहर चिंतामण पाटील, तुकाराम पुंडलिक माळी,संजय सिताराम पडेर, बाळासाहेब भास्कर मते, संतोष मधुकर केदारे, शांताराम आनंदा सपकाळे, डॉ. एन. परशुरामन, महेश केशव गायकवाड, दिनकर पांडुरंग शेवाळे, बाबुराव विष्णु पाटील, रोहिदास हिराजी चौधरी, सुरेश विठोबा नाठे, प्रविण फकिरा पाटील, महेंद्र दिगंबर गवळी, मिलिंद भालचंद्र जुन्नरे, सुदर्शन नामदेव रावनकोळे, उज्वला प्रदिप भामरे, जयश्री संजय जगदाळे, ज्ञानेश्वर गोकूळ पाटील यांचा समावेश आहे. मेडल, ट्राफी, पैठणी साडी, सन्मानपत्र,भेटवस्तू असे पुरस्काराचे स्वरुप आहे. यावेळी डॉ. किसान बायो रिसर्च इन्स्टिट्यूटचे डॉ. सुनिल दिंडे व डॉ. सागर पवार यांना 'डॉक्टरेट' या मानद पदवीने सन्मानित करण्यात आले. तसेच सेंद्रिय शेतीवर चर्चासत्र, आमची माती आमची माणसं मासिकाच्या आंबा लागवड विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. प्रसिद्ध गायिका रेखा महाजन व सुखदा महाजन यांची सुमधुर गितांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाने या सोहळ्यात रंगत आली. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी गोपीनाथ लामखडे,गोरक्षनाथ जाधव,सुनिल निकम,भगवान खरे,निवृत्ती न्याहारकर,मयुर गऊल,सविता जाधव,शाम गोसावी,वसंत आहेर,उत्तम रौंदळ, नाना पाटील, बाळासाहेब मते,गणेश पाटील,संदीप काळे, सागर रहाणे ,राजेंद्र धोंडगे,सुयोग जाधव, प्रशांत भदाणे, शांताराम कमानकर, सुनिल गमे आदिंनी परीश्रम घेतले.



# वृद्ध,दिव्यांगांच्या गृह मतदानासाठी पथक

**मूल । प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत पहिल्यांदाच ८५ वर्षांवरील नागरिक तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगाचे प्रमाणपत्र असलेल्या नागरिकांना गृहमतदानाची पर्यायी सोय उपलब्ध करून दिली आहे.त्यानुसार बल्लारपूर विधानसभा अंतर्गत एकूण २५३ नागरिकांनी गृह मतदानाची इच्छा दर्शविली आहे. त्यानुसार दहा पथकांची निर्मिती करण्यात आली आहे. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघ अंतर्गत बल्लारपूर विधानसभा मतदार संघामधील ज्येष्ठ मतदार आणि दिव्यांग मतदारांकरिता ८ ते ११ एप्रिल या चार दिवसांपर्यंत गृह मतदानाकरिता एकूण दहा पथके रवाना करण्यात आली आहे. त्याची सुरुवात सोमवारी मूल येथून करण्यात आली. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी,पात्र असलेला एकही मतदार मतदानापासून

वंचित राहू नये,यासाठी जिल्हा प्रशासनविविध उपक्रमांच्याजनजागृती करीत आहे.



माध्यमातूनमूल,पोंभुर्णा,बल्लारपूर या विधानसभा क्षेत्रात ८५ वर्षावरील ज्येष्ठ मतदार १९७ तर दिव्यांग मतदार ५६ असे एकूण २५३ मतदारांना गृह मतदानाची सोय घरपोच पोस्टल बॅलेटद्वारे करून देण्यात येणार आहे. निवडणुकीच्या कामासाठी कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी दुसऱ्या प्रशिक्षणाच्या दिवसी पोस्टल बॅलेट पेपरद्वारा मतदानाची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती. निवडणुकीच्या दिवशीही कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांसाठी इडीसीद्वारा मतदानाची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# हिंगणघाट शहरातील इंदिरा गांधी वार्ड येथील शेकडो महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी केला भाजपा ओबीसी मोर्चात प्रवेश

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक, युवा कार्यकर्ते तसेच महीला आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चात प्रवेश करीत आहेत.

काल दि. ०९ रोजी हिंगणघाट शहरातील इंदिरा गांधी वार्ड येथील असंख्य महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपा ओबीसी मोर्चात प्रवेश केला.

सदर प्रवेश सोहळ्याचे आयोजन काल दि. ०९ एप्रिल २०२४ रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले. याप्रसंगी



प्रामुख्याने उषा कडू, सोनू वडतकर, अर्चना ठाकरे, प्रतिभा सातघरे, गीता पवार, सीमा राऊत, दीपा अंबेरे, शोभा अंबेरे, मनोरमा कोल्हे, रेवतीनाथ भोयर, रेखा वडतकर, नंदा बडोदे, छाया पेटकर, रेणू लाकडे, मैनाबाई खेलकर, इंदुबाई मोरे, दमयंती मोरे , कमलाबाई हुलके, माया सातघरे , चंदा हांडे, प्रतिभा वडतकर, कुसुम राऊत, चंद्रकलाबाई वणीकर, मंदा मसराम, मयूर अंभेरे, देवेंद्र अंबेरे, संतोष उंबरकर, प्रल्हाद लेडे, राजीव दौलतकार, राजू बालकांडे, मंदा कानपिल्लेवार, शुभांगी मसकर, इंदुबाई जुमडे, शोभा राऊत, शांताबाई काळे, वंदना महल्ले, पूजा दौलतकार, लक्ष्मी मेंढे, रेखा काळे , सुनंदा काळे, अलका काळे, महेंद्र भाऊ, सागर भोयर, राजू बालपांडे, वाल्मीक पांडे, प्रभाकर गाडवे ,चिंतामण सहारे, रामदास भोयर ,प्रफुल बिजवार, प्रशांत कातुलवारे, प्रभू कोल्हे, पंकज बावणे ईत्यादी महिला व पुरुष कार्यकर्त्यांना भाजपा ओबीसी मोर्चात रितसर प्रवेश देण्यात आला. उपरोक्त कार्यक्रम आ. समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाचे वेळी कार्यसम्राट आ.समीर कुणावार यांचेसह ओबीसी प्रदेश महामंत्री रवी उपासे, ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष अनिल चापले, प्रा. योगेश वानखेडे , माजी नगरसेविका वंदना कामडी, माजी नगरसेविका वैशाली सुरकार, माजी नगरसेविका पद्मा कोडापे अनिता मावळे, देवा पडोळे, विवेक तडस, राजू माडेवार, प्रल्हाद दांडगे, सुरज कानपिल्लेवार, भानुदास कडू, दीपक धामसे इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते उपरोक्त पक्षप्रवेश सोहळ्यास उपस्थित होते.

### जीवनापूर येथे दोन दिवसीय

# क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले तथा विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच आयोजन

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

जीवनापूर येथील बौद्ध समाज मंडळ, समता महिला मंडळ तथा जोशाबा ग्रुप च्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती महोत्सव दिनांक १४ व १५ एप्रिल २०२४ ला साजरा करण्यात येत आहे.

१४ एप्रिल २०२४ ला सकाळी सात वाजता मिरवणूक काढण्यात येईल त्यानंतर ध्वजारोहण होईल नंतर भिक्खुसंघ भद्रावती यांच्याकडून धम्मदेसनेचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. भन्तेजी सच्चक महाथेरो धम्म प्रचार केंद्र, भद्रावती यांच्याकडून धम्मदेसना बौद्ध उपासक तथा उपासीका यांना देण्यात येणार आहे. त्यानंतर होय, मी सावित्री बोलतोय हा एकपात्री प्रयोग सादर होणार आहे. सदर प्रयोग आयुष्यमती *

विद्या सोनुले सेवानिवृत्त मुख्याध्यापिका महात्मा फुले विद्यालय, मेंडकी या सादर करणार आहेत तसेच रात्री आठ वाजता लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केलेले आहे.

दिनांक १५ एप्रिल २०२४ ला सकाळी साडेअकरा वाजता विशेष वैचारिक



प्रबोधन आयोजित केलेला आहे. या प्रबोधन कार्यक्रमाचे अध्यक्ष विनोद लांडगे सामाजिक विचारवंत, तळोधी बाळापुर हे उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राध्यापक चंदन नगराळे सामाजिक कार्यकर्ते, ब्रह्मपुरी तसेच विशेष मार्गदर्शक म्हणून डॉक्टर विद्या राईकवार बुद्ध फुले शाहू आंबेडकर चळवळीच्या अभ्यासक,वर्धा या उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर रात्री आठ वाजता संगीतमय प्रबोधन आयोजित केलेला आहे भीमशाहीर कमलेश भोयर व संच नागपूर प्रस्तुत ज्याचा जगात गाजा वाजा, भिमराव एकच राजा या बुद्ध, फुले, शाहू, शिव, भीम गीतांचा संगीतमय कार्यक्रम आयोजित केलेला आहे. सदर दोन दिवसीय कार्यक्रमाला खूप मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक बौद्ध समाज मंडळ, समता महिला मंडळ व जोशाबा ग्रुप जीवनापूर यांच्याकडून करण्यात आले आहे.

# महाकाली यात्रेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांचा कडून मंदिर परिसराची पाहणी



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्याची आराध्य दैवत म्हणून ओळख असलेल्या माता महाकाली यात्रेला १४ एप्रिलपासून सुरवात होणार आहे. यासंदर्भात करण्यात आलोल्या उपाययोजना बाबत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी मंदिर परिसराची पाहणी करून सूचना दिल्या. यावेळी पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, मनपा उपायुक्त चंदन पाटील, वाहतूक निरीक्षक प्रवीणकुमार पाटील, परिवहन महामंडळाच्या विभागीय नियंत्रक स्मीता सुतावणे, मंदिराचे विश्वस्त सुनील महाकाळे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, मंदिर परिसराची स्वच्छता नियमित होणे आवश्यक आहे. उन्हाळा असल्यामुळे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. तसेच गर्दी टाळण्यासाठी भाविकांचा प्रवेश आणि बाहेर जाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी. १९ एप्रिल रोजी लोकसभा निवडणुकीचे मतदान असल्यामुळे या परिसरात असलेल्या दोन मतदान केंद्राच्या परिसरात दि. १८ एप्रिलच्या दुपारपासून तर १९ एप्रिल रोजी मतदान संपेपर्यंत १०० मीटर परिसरात येण्यास बंदी राहणार आहे. याबाबत मंदिर व्यवस्थापनाने भाविकांना सूचना द्याव्यात. तसेच महानगर पालिकेने झरपट नदी व परिसराची स्वच्छता नियमित करावी. अशा सूचना जिल्हाधिका-यांनी दिल्या.यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा, पोलिस अधिक्षक श्री. सुदर्शन व इतर अधिका-यांनी माता महाकालीचे दर्शन घेतले.

# पंकजाताई मुंडेंना लोकसभेत पाठविण्यासाठी पालकमंत्री, आमदारांच्या गावोगावी बैठका

## स्थानिक नेते, कार्यकर्ते लागले कामाला;सुक्ष्म प्रचार यंत्रणा राबवून विक्रमी मताधिक्य देण्याचा निर्धार

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीसाठी येत्या १३ मे रोजी मतदान होत आहे. तब्बल २१ लाख १५ हजारे ८१३ इतके मतदान असलेल्या बीड जिल्ह्यात भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांना भाजप महायुतीने बीड लोकसभेची उमेदवारी दिल्यानंतर पालकमंत्र्यांसह भाजप महायुतीचे सर्व आमदार, माजी आमदार, जिल्हाध्यक्ष आदी नेत्यांसह महायुतीचे तालुका व गावपातळीवर काम करणारे पदाधिकारी, कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत. पंकजाताईंना विक्रमी मतांनी निवडून देत लोकसभेत मान-सन्मानाने पाठवण्याचा निर्धार सर्व जण विविध ठिकाणी बोलून दाखवत आहेत.

सध्या पंकजाताई मुंडे यांनी नुकताच प्रचाराचा पहिला टप्पा पूर्ण करून दुसरा टप्पा सुरू केला आहे. गावोगावी महायुतीचे कार्यकर्ते तसेच पालकमंत्री धनंजय मुंडे यांचेसह आमदार सुरेश धस, आ. प्रकाश सोळंके, आ. लक्ष्मण पवार, आ. बाळासाहेब आजबे, आ. नमिता मुंदडा, माजी आमदार केशवराव आधळे, भीमराव धोंडे, अमरसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के तसेच शिवसेनेचे जिल्हाप्रमुखांसह नेते मंडळी पंकजाताईंच्या प्रचारार्थ आपल्या बुथ पातळीवर अधिकाधिक मतदान मिळवून देण्यासाठी पायाला भिंगरी लावून फिरत आहेत.

यापूर्वी राज्य मंत्रीमंडळात स्वत:ची छाप पाडणारे काम करत जनमानसात दिवगंत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे विचार कायम ठेवणार्या पंकजाताई मुंडे यांच्याबद्दल जिल्ह्यातील भाजप-महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांबद्दल प्रचंड आदरभाव आहे. आता लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने पंकजाताईंना मोठ्या मताधिक्क्यांनी निवडून आणायचेच, असा निर्धार महायुतीचे कार्यकर्ते करु लागले आहेत. प्रत्येकाने आप-आपला बुथ सांभाळायचा, अन् अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहचून महायुतीची विचारधारा त्यांच्यापर्यंत पोहचवायची असे नियोजन सर्व बुथप्रमुख करु लागले असून आगामी एक महिन्यात कटाक्षाने प्रचारयंत्रणा सक्षम ठेवतानाच नवीन आणि यंदा पहिल्यांदाच मतदान करणार्या मतदारांपर्यंत संपर्क साधून भाजप-महायुतीचे कार्यकर्ते 'मोदी सरकार'ची कार्यप्रणाली आणि धोरणे त्यांच्यापर्यंत पोहचवण्याचे काम करण्यास सज्ज झाली आहे. याबरोबरच मागील दहा वर्षात केद्रांतील भाजप-एनडीए सरकारने गोरगरिब, वंचित, उपेक्षित कष्टकरी, कामगार यांच्यासाठी राबवलेल्या विविध योजना अन् त्यातून लाभ मिळालेल्या नागरिकांची भावना किती चांगली आहे, याबाबतचे सुक्ष्म नियोजन करत महायुतीचे सर्व कार्यकर्ते गावोगावी सरकारचे हे काम मतदारांपर्यंत पोहचवत आहेत. पंकजाताईंना विक्रमी मतांनी निवडून देत केंद्रात पुन्हा एकदा देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'अब की बार ४०० सो पार' चा नारा देतांना दिसत आहेत. गाव-वाडी-वस्ती-तांड्यापर्यत पोहचून पंकजाताईंना मतदान करण्याचे आवाहन कार्यकर्ते करत आहेत.



# चंद्रपूर लोकसभेत भाजपा उमेदवार निवडून मांडवसची भेट द्या भाजपा लोकसभा उमेदवार ना.सुधीर मुनगंटीवार यांचे आवाहन

## वरोरा तालुक्यात प्रचार व जाहिर सभांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**वरोरा । प्रतिनिधी**

आज गुढीपाडवा सण आहे, गुढीपाडवा म्हणजे मांडवस. पूर्वीपासुन शेतकरी बांधव हा सण साजरा करतात. या उत्सवामध्ये आपल्या शेतीत जो वर्षभर प्रामाणिक, उत्तम काम करतो. त्याला आपण मांडवसला पुन्हा वर्षभर काम करण्याची संधी देतो. आणि जो काम चुकारपणा करतो, त्याला कायमची सुट्टी देतो. आपल्या चंद्रपूर लोकसभा मतदार संघाचा लेखा जोखा बघितला तर विकास कामे झालेली दिसत नाही. त्यामुळे आज मांडवस उत्सव आहे, याच महिन्यात लोकसभा निवडणुक आहे. तुम्ही सर्व मला लोकसभेत पाठवून मांडवसची भेट द्या. आपण माझ्यावर विश्वास ठेवून या मांडवसला लोकसभेत पाठवले तर मी जीव ओतून काम करेल, असे आवाहन भाजपा लोकसभा उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा महाविकास आघाडीचे उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारार्थ जाहीर वरोरा तालुक्यातील सालोरा, मेसा, शेगाव, खेमजई, आसाळा, टेमुर्डा, खांबाडा आणि बारव्हा येथे प्रचार आणि जाहीर सभा पार पडली. या सभेला मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी गुढीपाडवा आणि मांडवसचा अर्थ उलगडून सांगितला. ते म्हणाले की, मी शेतकरी कुटुंबातील आहे. कष्टकरी शेतकरी मजूर बेरोजगार बेघर वंचित लोकांसाठी मी जीव तोडून काम करेल. जर मी काम केलें नाही तर मला पण सुट्टी द्या, असे भावनिक आवाहन ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. आज मला येथील अनेक लोकांनी भेटून वरोरा ते शेगाव रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केली व काही नागरिकांनी निवेदन दिले. मागील साडेचार वर्षात काँग्रेस पक्षाचे आमदार खासदार यांनी काहीही काम केले नाही. त्यामुळे आज येथील रस्त्यात चालताना उडी मारतो की काय? असे चित्र दिसून येते. आपण निवडून आल्यानंतर प्राधान्याने येथील रस्त्याचा प्रश्न सोडवू अशी ग्वाही त्यांनी दिली. पुढे बोलताना ते म्हणाले की, मी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही, घाणेरडे राजकारण केले नाही. मला एक दिवस ताप आला तरी काँग्रेसने त्याचे घाणेरडे राजकारण केले, पण मी विकासाचा राजकारण करतो विकासावर बोलतो. विकास हाच माझा प्रमुख मुद्दा आहे मुख्यमंत्री विलासराव देशमुख असताना माझा आदर्श आमदार म्हणून गौरव करण्यात आलेला आहे. मागील २९ वर्षापासून मी आमदार आहे मला विधानसभेत काम करण्याचा दांडगा अनुभव आहे. या अनुभवाच्या जोरावर मी संपूर्ण चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाचा कायापालट करेल याचा तुम्हाला विश्वास देतो असे ते म्हणाले. वरोरा, सालोरा, मेसा, शेगाव, खेमजई, आसाळा, टेमुर्डा, खांबाडा, बारव्हा येथे आयोजित सभेला विजय राऊत, डॉ. बोदकुलवार, इंजी. बोदकुलवार, रमेश राजूरकर, सागर कोहळे, गौरव हेकाळे, नितीन मत्ते , सदाशिव ताजने, किशोर टोंगे, भगवान गायकवाड, डॉ. अंकुश आगलावे, वंदना दाते, संगीता निंबाळकर, ओम मांडवकर, अमित चवले, आशिष ठाकरे, स्वाती बावने, कल्पना तुमरे, अर्चना चौधरी, अती शाम अली, सुनील वर्धे, सुमित वर्धे, निर्मला वर्धे, किसन वर्धे, मंजुळा दडमल, वनिता नरड, रूपाली नरड, स्नेहा लोकरे, चंदा खारकर, मंजुषा ताजने, शीतल साळवे, शिवानी साळवे, राजु गायकवाड, किरन ढोक, मारोती जांभळे, सरपंच वर्षा सरतापे, वासुदेव शेंडे, उमेश भुते, मोरेश्वर डुकरे, सिंधु जुमले, शुभम डाफ, विजय बोकासे, करन देवतळे, कविता बोराडे, गोपाळ गोगावले, किशोर पडोळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.



### वरोरा येथे ढोल ताशांच्या गजरात जंगी स्वागत

चंद्रपूर लोकसभा भाजपा उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांचे आज मंगळवारी सकाळी वरोरा येथे आगमन होताच भगव्या सांस्कृतिक वाद्य पथकाच्या ढोल ताशांच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांनी श्री राम मंदिर येथे पुष्पहार अर्पण करून श्रीराम यांचे दर्शन आशीर्वाद घेतले. तसेच मुख्य चौकातील स्वातंत्र्य विर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. या प्रसंगी राम मंदिर वरोराचे अध्यक्ष ॲड. जयंता ठाकरे यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी डॉ. सागर वझे, बाबा भागडे , गोडे , घनश्याम गोडे उपस्थित होते.

### काँग्रेसला मत म्हणजे विनाशच विनाश

कडूलिंबामध्ये कितीही साखर टाकली तरी ते कडूच राहते गोड होत नाही. तशीच अवस्था काँग्रेस पक्षाची झाली आहे, आज पर्यंत काँग्रेसने जनतेची निराशा केली आहे. त्यामुळे वरोरा भद्रावती विधानसभा मतदारसंघाचा विकास खुंटला आहे. या विभागाचा खऱ्या अर्थाने विकास करायचा असेल तर येत्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या कमळला मतदान करा, विकास म्हणजे कमळ आणि काँग्रेस म्हणजे विनाशच विनाश, अशी जोरदार टीका भारतीय जनता पक्षाचे लोकसभा उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांनी आज केली.

### सायबर क्राईमकडे करणार काँगेसची तक्रार

काँग्रेसने दंगल घडवून १९८४ ला आणीबाणीच्या काळात शीख बांधवांना प्रचंड त्रास दिला, अन्याय अत्याचार केला, याचा अर्धवट व्हिडिओ कट करून तो सोशल मीडियावर व्हायरल करण्यात येत आहे. या दंगलीत काँग्रेसने किती अन्याय अत्याचार केले हे सर्वश्रुत असताना मीडियामध्ये कुठलाही विपर्यास केलेला नाही. पण काँग्रेस मुद्दामपणे जनतेची दिशाभूल करण्यासाठी अर्धवट व्हिडिओ व्हायरल करने सुरू केले आहे. त्यामुळे याची आपण सायबर क्राईमकडे तक्रार करणार आहोत. त्यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी करू असे ना.मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.

### शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

देशाचे कर्तबगार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर, लोकसभा उमेदवार ना सुधीर मुनगंटीवार यांच्यावर विश्वास ठेवून शेकडो कार्यकर्ते रोज भाजपामध्ये प्रवेश करीत आहेत. आज वरोरा, सालोरा, मेसा, शेगाव, खेमजई, आसाळा, टेमुर्डा, खांबाडा, बारव्हा आदी क्षेत्रांतील शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपा प्रवेश केला. यामध्ये अनिल लोळे, मंगेश फुलकर, देवराव ढोके, नंदु फुलकर, देवराव नलावटे, प्रदीप चवरे, प्रणय नरड, नवजीवन मत्ते, दिनेश कावळे, भाउराव सोनुने, सूरज सहारे, आनंद पेटकर, विकास कष्टी, गुणवंत देहरकर, तुळशीराम साखरकर, प्रभाकर पेंदोर, भारत कुमरे, राजेंद्र जुगणाके, सुरेश किंन्नाके, आकाश ओयाम, आकाश भगत, रीतिक सोयाम, निलेश पेंदोर, मनोहर मेश्राम, अरूण चांभारे, दिवाकर जुमणाके, नंदकिशोर चिडे, प्रभाकर नाथे, कैलास येरमे, सौरभ टोंगे, सौरभ जुमणाके यांनी भाजपामध्ये प्रवेश घेतल्याबद्दल ना. सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांचे स्वागत करून पुढील वाटचालिकरिता शुभेच्छा दिल्या.

# आनंदवन सकारात्मक ऊर्जेचे केंद्रबिंदू ना.सुधीर मुनगंटीवार यांचे प्रतिपादन

## डॉ.विकास आमटे यांची घेतली भेट



### श्रद्धेय बाबांच्या समाधी स्थळाला भेट...

आनंदवन येथे भेट दिल्यानंतर ना. सुधीर मुनगंटीवार यांनी श्रद्धेय बाबा आमटे, श्रीमती साधनाताई आमटे यांच्या समाधीस्थळाला भेट दिली. यावेळी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

**वरोरा । प्रतिनिधी**

श्रद्धेय बाबा आमटे यांनी आनंदवनाची स्थापना केली. त्यातून मानवमुक्तीचे स्वप्न पाहिले. मानवमुक्तीचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी बाबा आमटेंनी आनंदवनाचा दुर्मिळ प्रयोग साकारला. डॉ. विकास आमटे यांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून तो आत्मीयतेने पुढे घेऊन जात आहेत. हा प्रयोगशील प्रवास दिसतो तेवढा सोपा नाही. त्यामुळे आनंदवन हे जीवन जगण्यासाठी सकारात्मक ऊर्जेचे केंद्रबिंदू आहे, असे प्रतिपादन चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा महाविकास आघाडीचे उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.


वरोरा येथील महारोगी सेवा समितीच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या आनंदवन येथे भेट देऊन सचिव डॉ. विकास आमटे यांची त्यांनी भेट घेतली. यावेळी ते चर्चेदरम्यान बोलत होते. पुढे बोलतांना ना. मुनगंटीवार म्हणाले की, आज मी चंद्रपूर लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीत भाजपाचा अधिकृत उमेदवार म्हणून ही निवडणूक लढवीत असून आज आपले आशीर्वाद घेण्यासाठी इथे आलो आहे. मला आमटे कुटुंबियांकडून नेहमीच आपुलकी व प्रेम मिळाले आहे. प्रेम इथे आल्यावर मला काम करण्याची अधिक ऊर्जा मिळते. शिकल्या-सवरलेल्या शहरी माणसाला लाजवतील अशी कामे या आणि अशा अनेकांनी आनंदवनात आजवर साकारली आहेत. डॉ. विकास आमटे याना भेटून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. प्रकृती साथ देत नसली असली तरीही या आजाराला सकारात्मकरित्या तोंड देण्याची त्यांची जिद्द आणि या परिस्थितीत देखील आयुष्य समृद्धपणे जगण्याची इच्छा त्यांच्या देहबोलीतून जाणवली, असेही ना. मुनगंटीवार म्हणाले.

आज आनंदवन हे भलंमोठं कुटुंब आहे. हे कुटुंब यांत्रिकीकरणाच्या आहारी न जाता नांदत आहे. मूलभूत गोष्टींसाठीचा संघर्ष काय असतो, हे न कळणारी तरुण पिढी या माणसांकडून खूप काही मिळवू शकते. मला वाटतं, हे सगळे आजच्या तरुणांना कळणे आवश्यक असल्याचे ना. मुनगंटीवार यांनी नमूद केले. त्यावर महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे म्हणाले की, माझे आशीर्वाद आणि शुभेच्छा आपल्या सोबत आहे. आपल्या सारखा कर्तुत्ववान अभ्यासू लोकनेता लोकसभेत निवडून दिला तर या जिल्ह्याचा कायापालट होईल, असा विश्वास डॉ. विकास आमटे यांनी व्यक्त केला. आनंदवन येथे आगमन होताच दिव्यांग कवी रमेश बोपचे यांनी ना. सुधीर मुनगंटीवार यांच्यावर केलेली सुंदर कवितेची फोटोफ्रेम भेट दिली. त्यानंतर त्यांचे समितीच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी महारोगी सेवा समितीचे विश्वस्त सुधाकर कडू,कवीश्वर काका, राजेश ताजने, सदाशिव ताजने, बाबा भागडे, रमेश राजूरकर, नितीन मत्ते किशोर टोंगे, डॉ. भगवान गायकवाड, शुभम चांभारे, आशिष ठाकरे, सागर कोहळे, बाळू पिसाळ, अमित चावले, अविनाश कुळसंगे, शरद पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# गुढीपाडव्यानिमित्त प्रयास सखी मंच घुग्घुसतर्फे भव्य दुचाकी रॅली







**घुग्घुस । प्रतिनिधी**

चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू नववर्ष वर्षारंभ म्हणजेच गुढीपाडवा त्याग, मांगल्य व सात्विकतेच प्रतिक असलेला हिंदूचा नववर्ष दिन घुग्घुस शहरात महिलांची भव्य दुचाकी रॅली काढून गुढी उभारून गुढीपाडवा उत्सव प्रयास सखी मंच घुग्घुसच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रयास सखी मंच घुग्घुसच्या वतीने काढण्यात आलेल्या दुचाकी रॅलीचा प्रारंभ माजी जि.प. अध्यक्ष देवराव भोंगळे यांनी भगवा ध्वज दाखवून केला.

बसस्थानक, बहिरमबाबा नगर, मार्गे मार्गक्रमण करीत दुचाकी रॅलीचे समापन करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, माजी जि.प. चिन्नाजी नलभोगा, माजी सदस्य सिनु इसारप, जिल्हा सचिव विनोद चौधरी, भाजयुमोचे अमोल थेरे, सुनील बाम, प्रयास सखी मंच मार्गदर्शिका अर्चना भोंगळे, प्रयास सखी मंच अध्यक्षा किरण बोढे, माजी जि.प. सभापती नितू चौधरी, माजी सदस्य पूजाताई दुर्गम, माजी सदस्य वैशालीताई ढवस , माजी सदस्य सुचिता लुटे, माजी सदस्य सुषमा सावे, माजी सदस्य नंदा कांबळे, शंकर सिद्धम, सुरेन्द्र जोगी, धनराज पारखी, तुलसीदास ढवस, सिनू रामटेके, मल्लेश बल्ला, नितीन काळे, सुरेंद्र भोंगळे, कोमल ठाकरे, पियूष भोंगळे, प्रणय बोकडे, विनोद जंजर्ला, विवेक तिवारी, वमशी महाकाली, इर्शाद कुरेशी, मानस सिंग, स्वप्नील इंगोले, वृंदाताई भोंगळे, विनाताई बांगडे, सुनंदाताई ठाकरे, सुनीताताई घिवे, सरिताताई इसराप, सीमाताई पारखी, सारिकाताई भोंगळे, लक्ष्मीताई नलभोगा, व मोठया संख्येत दुचाकीस्वार महिला उपस्थित होत्या.

# निवडणूक निरीक्षकांचा महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील नागरिकांसोबत संवाद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा मतदार संघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल २०२४ रोजी होणार असून यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी केली आहे. या तयारीची पाहणी करण्याकरिता सामान्य निवडणूक निरीक्षक लोकेशकुमार जाटव यांनी जीवती तालुक्यातील महाराष्ट्र आणि तेलंगणा राज्याच्या सीमेवर असलेल्या मतदान केंद्राला यांनी भेट दिली. तसेच येथे कार्यरत कर्मचारी आणि नागरिकांशी संवाद साधला.



महाराष्ट्र - तेलंगणा सीमेवरील अंतापूर, पद्मावती, इंदिरानगर, पळसगुडा, येसापूर, भेलापठार, लेंडीगुडा, येसापूर (नारायणगुडा), शंकरलोधी, महाराजगुडा, कोठा (बु.), परमडोली, मुकदमगुडा आणि लेंडीजाळा या १४ गावांसाठी एकूण सहा मतदान केंद्र राहणार आहेत. यातील पुडीयालमोहदा आणि परमडोली या मतदान केंद्राला निवडणूक निरीक्षक श्री. जाटव यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, पोलिस पाटील व स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. निवडणूक संदर्भात काही अडचण आहे का, दोन्ही राज्यासाठी मतदान करता का, मतदार माहिती चिठ्ठी मिळाल्या का, याबाबत त्यांनी नागरिकांना विचारणा केली. यावेळी जीवतीचे तहसीलदार अविनाश शेंबटवाड, नायब तहसीलदार श्री. वाहने, तलाठी मेटलवार आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित होते. मतदान केंद्रनिहाय मतदार संख्या : महाराष्ट्र - तेलंगणा सीमेवरील १४ गावांसाठी असलेल्या सहा मतदान केंद्रातंर्गत २६९४ पुरुष मतदार तर २४२३ स्त्री मतदार असे एकूण ५११७ मतदार आहेत. यात पुडीयालमोहदा मतदान केंद्रातंर्गत एकूण ७२२ मतदार (पुरुष - ३७४, स्त्री - ३४८), कुंभेझरी मतदान केंद्रातंर्गत एकूण १४३५ मतदार (पुरुष - ७५५, स्त्री - ६८०), भोलापठार मतदान केंद्रातंर्गत एकूण ८३१ मतदार (पुरुष - ४३६, स्त्री - ३९५), वणी (खु.) मतदान केंद्रातंर्गत एकूण ६१२ मतदार (पुरुष - ३२४, स्त्री - २८८), महाराजगुडा मतदान केंद्रातंर्गत एकूण ३०१ मतदार (पुरुष - १५२, स्त्री - १४९) आणि परमडोली मतदान केंद्रांतर्गत एकूण १२१६ मतदार (पुरुष - ६५३, स्त्री - ५६३) आहेत.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .